## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भूम

आर.सी.सी.क्र.७४/२०१७
शासन / तात्या
**निशाणी क्र.५३**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ यांची जबानी**
**मी शपथेवर निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :- | मोतिराम आदिनाथ चव्हाण. |
| माझे वय सुमारे | :- | ५२ वर्षे |
| माझा व्यवसाय | :- | शेती |
| माझे राहण्याचे ठिकाण | :- | वाल्हा, ता.भूम, जि.धाराशिव. |

**सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्री.यु.बी.दोलतोडे –**

**०१.** मी आरोपींना ओळखतो ते आमच्या गावातील आहेत. ते आजरोजी न्यायालयात हजर आहेत. घटना दि.२५/०४/२०१७ रोजी अष्टमी यात्रेच्या दिवशी सायंकाळी ५.०० वा. सुमारास घडली. त्यादिवशी मी माझे घरी असतांना आरोपींनी मला दारु पिण्यासाठी पैसे मागितले होते परंतू मी त्यांना पैसे दिले नाहीत. त्यानंतर मी आमचे घरासमोरील शेतामध्ये जनावरांना गवत आणण्यासाठी गेलो होतो व माझ्या घरचे यात्रेला गेले होते. त्यावेळी आरोपी माझ्या दारासमोर उभी असलेली माझी मोटारसायकल जिचा क्र.MH-25D-8684 घेऊन गेले. तेव्हा शाळेतील मुलांनी मला सांगितले की, तुमची गाडी आरोपी घेऊन जात आहेत. त्यावेळी माझा पुतन्या रत्नदिप शिवाजी चव्हाण याने आरोपींचा पाठलाग केला, मीही गवत घरी ठेवुन त्यांचा पाठलाग केला. त्यावेळी आरोपी क्र.२ पळुन गेला व आरोपी क्र.१ तिथेच होता. आरोपी क्र.१ ने माझ्या पुतन्या रत्नदिप याच्या डाव्या कानावर दगडाने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर घटनेच्या दुसऱ्या दिवशी भूम पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली. मला आता दि.२६/०४/२०१७ रोजीची फिर्याद

दाखविण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास नि.क्र.**५४** देण्यात येते. त्यानंतर मी पोलिसांनी घटनास्थळ दाखवले ते माझ्या घरासमोरच होते तसा पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा केला. त्यावेळी आमचे सोबत राम कुलकर्णी, दासु शेळवणे व पोलिस कर्मचारी होते.

**आरोपी क्र.१ च्या विधिज्ञांचा पुकारा केला असता गैरहजर सबब उलटतपास नाही.**

**उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे विधिज्ञ श्री.एस.टी.जाधवर यांच्यामार्फत सुरु :-**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही.

**वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

स्वाक्षरीत/-
**(श्रीमती ए.बी.जोंधळे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, भूम.

दिनांक : ०५/०७/२०२५